**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**राष्ट्रीय बातमीपत्र**
**सकाळी 08 वाजून 30 मिनिटं**

**दिनांकः05.10.2025** **वारःरविवार**

---

**ठळक बातम्या,**

- **युवा केंद्रित कौशल्य, शिक्षण आणि उद्योजकतेला चालना देणार्या उपक्रमांचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल उद्घाटन**
- **देशाला डाव्या विचारसरणीच्या कट्टरवाद्यांपासून एक वर्षांत मुक्त करण्याच्या संकल्पाचा केंद्रीय गृहमंत्र्याकडून पुनरूच्चार**
- **सात ते पंधरा वर्ष वयोगटात मुलांची आधार माहिती अद्ययावत करण्याचे शुल्क एक वर्षापर्यंत माफ**
- **आपकी पुंजी आपका अधिकार या देशव्यापी मोहिमेचा अर्थमंत्र्यांच्या हस्ते गुजरात इथं प्रारंभ**
- **सीमा रस्ते संघटनेद्वारे सर्वोच्च १९ हजार ४०० फूट उंचीवर रस्ता बांधण्याचा नवा विक्रम**
- **आणि**
- **महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत - पाकिस्तान लढत**

**आता सविस्तर बातम्या**

**मोदी युवकशक्ती**

आजचा भारत कौशल्य विकासाला प्राधान्य देत असून देशातील युवकांचं सामर्थ्य देशाला प्रगतीपथावर नेईल असा विश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केला. पंतप्रधानांनी काल शिक्षण, कौशल्य आणि उद्योजकतेला चालना देणाऱ्या ६२ हजार

कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाच्या विविध युवक-केंद्रित उपक्रमांचं अनावरण केलं, त्यावेळी ते बोलत होते. कौशल्य वाढलं की देश आत्मनिर्भर होतो, निर्यात वाढली की रोजगाराच्या संधींमध्ये वाढ होते त्यामुळे कौशल्यवृद्धीसाठीच्या पी एम सेतू योजनेमुळे देशातील युवावर्ग जगाच्या कौशल्य मागणीशी जोडला जाईल, असं प्रतिपादन पंतप्रधानांनी केलं. नवी दिल्लीत विज्ञान भवनात आयोजित कौशल्य दीक्षांत समारंभाला संबोधित करताना ते बोलत होते. देशातल्या औद्योगिक प्रशिक्षण संस्था म्हणजे आयटीआय, केवळ प्रशिक्षणापुरत्या मर्यादित नसून त्या आत्मनिर्भर भारताच्या कार्यशाळा आहेत. देशात उत्पादकता, रोजगार, संरक्षण क्षेत्रात उत्पादकता वाढली आहे, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांमध्ये रोजगार वाढला आहे आणि याचा लाभ भारताच्या युवाशक्तीला होत आहे, असं ते म्हणाले.

**अमित शहा डावे**

देशाला पुढील वर्षाच्या ३१ मार्चपर्यंत डाव्या विचारसरणीच्या कट्टरवाद्यांपासून मुक्त करण्याच्या, केंद्र सरकारच्या संकल्पाचा पुनरूच्चार केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल केला. छत्तीसगड राज्यात जगदलपूर इथं बस्तर दसरा लोकात्सवाला संबोधित करताना शहा बोलत होते. नक्षलवाद्यांच्या समस्येमुळे बस्तरसारखा प्रदेश दीर्घकाळ विकासापासून वंचित राहिला, असल्याचं त्यांनी नमूद केलं. माओवाद्यांनी हिंसाचार सोडून समाजाच्या मुख्य प्रवाहात सामील व्हावं असं आवाहन करताना त्यांनी सशस्त्र संघर्षाच्या मार्गावर चालणाऱ्यांना सुरक्षा दलांकडून होणाऱ्या कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल असा इशारा दिला.

**अमित शहा गोवा**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या हस्ते काल गोवा सरकारच्या माझे घर योजनेचा शुभारंभ करण्यात आला. सरकारी आणि सामुदायिक जमिनींवर बांधलेली घरे नियमित कऱणे आणि दीर्घकाळापासून राहाणाऱ्या रहिवाशांना मालकी हक्क देणे हा

योजनेचा उद्देश आहे. शहा यांच्या हस्ते जवळपास अडीच हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक किंमतीच्या विकास प्रकल्पांचे उद्धाटन आणि पायाभरणीही करण्यात आली.

**जे. पी. नड्डा**

देशभरात सुरू असलेल्या स्वस्थ नारी, सशक्त परिवार अभियान प्रभावीपणे राबवण्यासाठी आणि देशातल्या नारी शक्तीला ते फायदेशीर ठरण्यासाठ, अथक परिश्रम करणाऱ्या सर्वांच्या प्रयत्नांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी कौतुक केले आहे. केंद्रीय मंत्री जे. पी. नड्डा यांनी समाज माध्यमांवर यासंदर्भात लिहिलेल्या संदेशाला उत्तर देताना मोदी यांनी ही मोहिम म्हणजे लोकसहभागाचे खणखणीत उदाहरण असल्याचं म्हटलं आहे. तत्पुर्वी, केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे पी नड्डा यांनी या अभियानाने सहा कोटी पन्नास लाख महिलांची तपासणी करण्याचा, ऐतिहासिक टप्पा गाठल्याचं म्हटलं आहे.

**आधारशुल्क**

भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाने ७ ते १५ वर्षे वयोगटातील मुलांसाठीच्या आधार बायोमेट्रीक माहिती अद्ययावत करण्यासाठीचे शुल्क एक वर्षासाठी माफ केले आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाने जारी केलेल्या एका निवेदनानुसार, या वयोगटासाठी अनिवार्य बायोमेट्रीक अद्ययावतीकरणाचे शुल्क माफ करण्याच्या प्रक्रियेला येत्या एक ऑक्टोबरपासून सुरुवात झाली आहे.

**हे राष्ट्रीय बातमीपत्र आपण आकाशवाणीच्या पुणे केंद्रावरुन ऐकत आहात.**

**अर्थमंत्री गुजरात**

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल गुजरातमध्ये आपकी पुंजी आपका अधिकार या देशव्यापी मोहिमेचा शुभारंभ केला. वित्तीय व्यवस्थेतील विविध क्षेत्रांमध्ये असलेल्या बेवारस आर्थिक मालमत्तेचा जलद निपटारा करणे हा या

मोहिमेचा उद्देश आहे. या मोहिमेमुळे, कायदेशीर दावेदारांना बेवारस ठेवींचा योग्य परतावा मिळण्यास हातभार लागेल असं अर्थमंत्री यावेळी बोलताना म्हणाल्या.

**बिहार मुख्यनिआयुक्त**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या अध्यक्षतेखाली संपूर्ण निवडणूक आयोग बिहारमधील पटना इथं प्राप्तीकर विभाग, अंमलबजावणी संचालनालय, बँका, रेल्वे, विमानतळ, अमली पदार्थ नियंत्रण कक्षासह इतर अधिकाऱ्यांची भेट घेणार आहेत. राज्यातल्या आगामी निवडणुकांच्या तयारीच्या आढाव्यासाठी निवडणूक आयोगाचे पथक दोन दिवसांच्या बिहार दौऱ्यावर आहे. त्याशिवाय हे पथक केंद्रीय आणि राज्य पोलिस दलांचे अधिकारी, पोलिस महासंचालक, मुख्य सचिव आणि इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेणार आहेत. या पथकानं काल १२ मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसमवेत बैठक घेतली होती.

**सीमारस्तेसंघटना**

सीमा रस्ते संघटनेने हिमांक प्रकल्पाअंतर्गत पूर्व लडाखमध्ये समुद्रसपाटीपासून १९ हजार ४०० फूट उंचीवर प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळ वाहन वाहतुकीसाठी योग्य, जगातला सर्वात उंच रस्ता बांधून, एक नवा जागतिक विक्रम रचला आहे. संघटनेने उमलिंग इथला सर्वात उंचीवरील रस्त्याचा विक्रम मागे टाकला आहे. ब्रिगेडीयर विशाल श्रीवास्तव यांच्या नेतृत्वाखाली संघटनेच्या चमूनं ही कामगिरी पार पाडली.

**ब्रिटनपंप्र**

ब्रिटनचे पंतप्रधान किर स्टारमर ८ ऑक्टोबरपासून दोन दिवसांच्या भारत दौऱ्यावर येत आहेत. स्टारमर यांचा हा पहिलाच अधिकृत दौरा आहे. ते ९ ऑक्टोबरला मुंबईत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेऊन, व्हिजन २०३५ या १० वर्षांच्या आराखड्याच्या अनुषंगाने उभय देशांतल्या व्यापक धोरणात्मक भागीदारी अंतर्गत, विविध क्षेत्रातील प्रगतीचा आढावा घेतील.

**अमेरिका भारतीय विद्यार्थी**

टेक्सासमधील डेंटन इथं झालेल्या गोळीबारात मृत्युमुखी पडलेला भारतीय विद्यार्थी चंद्रशेखर पोळे याच्या दुर्दैवी मृत्युबद्दल ह्युस्टनमधील भारतीय वाणिज्य दुतावासानं तीव्र शोक व्यक्त केला आहे. पोळे हा हैदराबादचा रहिवासी होता, वाणिज्य दुतावास पोळे कुटुंबियांच्या संपर्कात असून, त्यांनी सर्वतोपरी मदत करत असल्याची माहिती दुतावासाने दिली आहे. तेलंगणचे मुख्यमंत्री रेवंत रेड्डी यांनी या घटनेबद्दल दुःख व्यक्त करत, त्याच्या कुटुंबियांना मदत करण्याचे आश्वासन समाज माध्यमांवरील संदेशातून दिले आहे.

**जपान-भूकंप**

जपानमध्ये काल रात्री, ६ शिंडो क्षमतेच्या भूकंपाचे धक्के जाणवले अशी माहिती जपानच्या राष्ट्रीय भूकंपविज्ञान केंद्रानं दिली आहे. त्याचे केंद्र ५० किलोमीटर खोलवर होता. जपान देश हा अत्यंत सक्रिय अशा भूकंपीय क्षेत्रात असत्यामुळे या देशात नेहमीच कमी अधिक तीव्रतेचे भूकंप आढळून येतात.

**संध्यानिधन**

ज्येष्ठ अभिनेत्री आणि नृत्यांगना संध्या शांताराम यांचं काल मुंबईत निधन झालं. त्या ८७ वर्षांच्या होत्या. निर्माता आणि दिग्दर्शक व्ही. शांताराम यांच्या नवरंग या चित्रपटातून त्यांना प्रसिद्धी मिळाली. झनक झनक पायल बाजे, दो आँखे बारह हाथ, पिंजरा अशा विविध चित्रपटांमधून त्यांनी केलेल्या भूमिका गाजल्या. संध्या यांच्या पार्थिवावर काल दादर इथल्या शिवाजी पार्क मधील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी अभिनेत्री संध्या यांना आदरांजली वाहिली.

**पॅराअथेलेटिक्स**

भारतानं काल नवी दिल्लीत झालेल्या जागतिक पॅरा अथेलेटिक्स करंडक स्पर्धेत ३ पदकं जिंकली त्यामुळे आता भारताची आत्तापर्यंतची पदक संख्या १८ झाली आहे. यामध्ये ६ सुवर्ण, ७ रौप्य आणि ५  कांस्य पदके आहेत. ही भारताची ऐतिहासिक कामगिरी आहे. कोबे, जपान येथे झालेल्या मागील स्पर्धेमध्ये, भारतानं एकंदर १७ पदकं जिंकली होती.  काल एकता भ्यान हिनं क्लब थ्रो मध्ये, सोमन राणानं शॉट पुट मध्ये रौप्य पदक तर प्रवीण कुमारनं उंच उडी मध्ये T64 गटात कांस्य पदक मिळवलं.

**क्रिकेट**

भारत विरुद्ध वेस्ट इंडिज कसोटी क्रिकेट मालिकेत अहमदाबाद इथं झालेला पहिला सामना भारतानं एक डाव आणि १४० धावांनी जिंकून मालिकेत १–० अशी आघाडी घेतली आहे. भारतीय गोलंदाजांनी उत्तम कामगिरी करत वेस्ट इंडिजला दुसऱ्या डावात चीत केलं. वेस्ट इंडिजच्या अलिका अथानाझे याच्या ३८ धावा वगळता इतर कोणताही खेळाडू आपला प्रभाव दाखवू शकला नाही.

**महिला क्रिकेट**

महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत भारताचा सामना आज पाकिस्तानबरोबर श्रीलंकेतल्या कोलंबो इथल्या आर प्रेमदासा स्टेडियमवर होणार आहे. पाकिस्तान बरोबर आतापर्यंत झालेल्या सर्व प्रकारच्या सामन्यांमध्ये भारताच्या महिला चमूनं २७ पैकी २४ सामने जिंकले आहेत. दरम्यान काल श्रीलंका आणि ऑस्ट्रेलिया दरम्यानचा सामना पावसामुळे रद्द करावा लागला.

**शेवटी पुन्हा ठळक बातम्या,**

- युवा केंद्रित कौशल्य, शिक्षण आणि उद्योजकतेला चालना देणार्या उपक्रमांचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल उद्घाटन
- देशाला डाव्या विचारसरणीच्या कट्टरवाद्यांपासून एक वर्षांत मुक्त करण्याच्या संकल्पाचा केंद्रीय गृहमंत्र्याकडून पुनरूच्चार
- सात ते पंधरा वर्ष वयोगटात मुलांची आधार माहिती अद्ययावत करण्याचे शुल्क एक वर्षापर्यंत माफ
- आपकी पुंजी आपका अधिकार या देशव्यापी मोहिमेचा अर्थमंत्र्यांच्या हस्ते गुजरात इथं प्रारंभ
- सीमा रस्ते संघटनेद्वारे सर्वोच्च १९ हजार ४०० फूट उंचीवर रस्ता बांधण्याचा नवा विक्रम
- आणि
- महिला विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत आज भारत - पाकिस्तान लढत

# आकाशवाणी पुणे केंद्राचं राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.